महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,


महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग टपालपेटी,क्रमांक १००३६, मुंबई४००००१.

WWW.DVET.GOV.IN e-mail::DVETEXAMS@YAHOO.COM/desk9@dvet.gov.in

TEL 022--22620293/226201008/022-22620603/604/**022-22694596**


क्र९./सीटीएसपरीक्षा/२०१८/४७८

दिनांक :- २२/६ /२०१७

प्रति,

सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय- शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या अखिल भारतीय व्यवसाय सत्र परिक्षांचे शुल्क स्टेट बॅंक ऑफ इंडिया मध्ये जमा करण्याबाबत.

संदर्भ- १. शासन निर्णय क्र आयटीआय-२०१०/५९/प्र.क्र.३२/व्यशि-३ दि.२५.५.२०१५
२. संचालनालयाचे पत्र क्र.९./सीटीएसपरीक्षा/प्र.क्र.२३९/२०१७/८४७, दि.७/१२ /२०१७
३. संचालनालयाचे पत्र क्र९./सीटीएसपरीक्षा/२०१८/२६७, दिनांक :- ३१/३ /२०१८

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, वरील संदर्भिय शासन निर्णय क्र.१ नुसार शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना/शिकाऊ उमेदवारी योजना व एससीव्हीटी अंतर्गत व्यवसाय अभ्यासक्रम इत्यादी परीक्षांकरीता परीक्षा शुल्कात सुधारणा करणे/ मानधनात सुधारणा करणे व परीक्षा शुल्काची रक्कम स्विय प्रपंजी लेखा (PLA) मध्ये जमा करून परीक्षेच्या अनुषंगाने होणारा खर्च त्यामधून भागविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार जुलै-२०१५ ते जुलै-२०१७ चे परीक्षेपर्यंतचे सर्व परीक्षांचे परीक्षा शुल्क स्विय प्रपंजी लेखा (PLA) मध्ये जमा करण्यात आले आहे.

जानेवारी २०१८ पासून पुढे होणा-या सर्व परीक्षांचे परीक्षा शुल्क सोसायटीच्या नावे नव्याने उघडण्यात आलेल्या Axis Bank खात्यावर जमा करण्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये कळविण्यात आले होते.

तथापि, मा.अध्यक्ष MSCVT तथा मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांनी MSCVT Governing Council च्या दिनांक ९.३.२०१८ रोजीच्या तिस-या बैठकीत, शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या परीक्षांचे परीक्षा शुल्क MSCVT च्या बॅंक खात्याऐवजी पुर्वीप्रमाणेच संदर्भिय शासन निर्णय क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणेच संचालनालयाच्या स्विय प्रपंजी खात्यात (PLA) जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये सर्व प्रादेशिक कार्यालयांना कळविण्यात आले आहे. परंतू अद्यापही काही औद्योगिक प्रशिक्षण संस्था परीक्षा शुल्क Axis Bank, Crowford Market शाखेतच जमा करीत असल्याचे आढळून येते. त्या अनुषंगाने आपणांस पुनःश्च कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना उपरोक्त सर्व परीक्षांचे परीक्षा शुल्क Axis Bank खात्यात जमा न करता ते पुर्वीप्रमाणेच संचालनालयाच्या नावे असलेल्या स्टेट बॅंक ऑफ इंडिया शाखा - फोर्ट मुंबई या खात्यावर जमा करण्याबाबत आपले स्तरावरून सुचना देण्यात याव्यात. सदर बॅंक खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Account Name | Director of Vocational Education and Training |
| Bank Name | State Bank of India |
| Branch | Fort, Mumbai |
| Account No. | ३५३७९४०५४७४ |
| IFSC No. | SBIN0000300 |

(ए.जी.गावित)
उपसंचालक

प्रत- सर्व शासकीय/अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत उपरोक्त परीक्षांचे जमा होणारे परीक्षा शुल्क हे स्टेट बँक ऑफ इंडिया या शाखेत संचालकांच्या नावे असलेल्या खात्यात जमा करावे.